# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी स्टेशन जवळ, मुंबई-४०००१३.
दुरध्वनी क्र. ०२२-४३२२६८२५/४३२२६८२६,ई मेल - mlwbpro53gmail.com / pro.mlwb-mh@gov.in

जा.क्र.मका/प्रजवि/२०२०-२१/ ०४ दिनांक : १५/०१/२०२१

## - : जाहीर प्रकटन :-

### विषय - श्रमकल्याण युग पुरस्कार विशेषांक छपाईसाठी दरपत्रक मागविणेबाबत

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे सन २०१५-१६ व २०१७-१८ या दोन वर्षाचे गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार व कामगार भूषण पुरस्कार वितरण सोहळा दि.९ फेब्रुवारी २०२१ रोजी आयोजित करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने मंडळाच्या कार्याचा व पुरस्कार्थींचा परिचय करुन देणारा मराठी भाषेतील **श्रमकल्याण युग विशेषांक** छपाईसाठी सक्षम ठेकेदार / मुद्रणालय यांचेकडून विहित नमून्यात दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| कामाचा तपशिल | विशेषांक संख्या | दर प्रती अंक | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| **श्रमकल्याण युग पुरस्कार विशेषांक छपाई**<br>१) अंकाची अक्षरजुळणी, मांडणी व सजावट, मुद्रितशोधन, स्केच, ग्राफिक्स, फोटो प्रोसेसिंग, स्कॅनिंग, मुखपृष्ठ व मलपृष्ठ डिझायनिंग इत्यादी अनुषंगिक कामे.<br>• अंकाचा आकार १९ से.मी. × २७ सें.मी असेल.<br>• मुखपृष्ठ व मलपृष्ठासह अंदाजित पृष्ठसंख्या - ७२.<br>• मुखपृष्ठ व मलपृष्ठ लॅमिनेशनसह - १७० जीएसएम ग्लास<br>• आर्ट पेपर - आतील पाने - १०० जीएसएम ग्लास आर्ट पेपर -<br>• छपाई चार रंगात | २००० | | |
| अधिक जीएसटी | | | |
| एकूण रक्कम रु. | | | |
| २) दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.२२.०१.२०२१ दुपारी २.०० वाजेपर्यंत | | |
| ३) दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | दि.२२.०१.२०२१ दुपारी ३.०० वाजता | | |

नियम, अटी व सूचना -

१. अंक आणि पृष्ठ संख्या कमी-जास्त होऊ शकते. अंकांच्या व पृष्ठांच्या संख्येनुसार अंतिम देयक अदा करण्यात येईल.

२. अंकाकरीता आवश्यक मजकुर व छायाचित्र मंडळाकडून पुरविण्यात येतील. अंकातील छायाचित्र प्रोससिंग व छपाईसाठी लागणारे चार रंगी पॉझिटिव्ह /प्लेट याचा खर्च छपाईदारास करावा लागेल. यासाठी वेगळा खर्च दिला जाणार नाही.

३. मंडळाच्या सूचनेनुसार अंकासाठी मुखपृष्ठ, मलपृष्ठ, स्केच, ग्राफिक्स आदी तयार करावे लागतील.

४. मुखपृष्ठाचे आर्ट वर्क तीन डिझाइनमध्ये तसेच संपुर्ण अंकाचे डिझाईन मंडळाच्या अंतिम मान्यतेकरिता सादर करणे बंधनकारक राहील.

५. अंकाच्या ओपन फाईलवर मंडळाचा हक्क असेल. ठेकेदाराने सदर ओपन फाईल (फॉन्टसह) मंडळास देणे बंधनकारक राहील.

६. कार्यादेश मंजुरीपत्रक मिळाल्यापासून दिनांकापासून ८ (आठ) दिवसांत काम पुर्ण करुन अंक मंडळाकडे सुपुर्द करणे बंधनकाराक राहील.

७. अंक छपाईकरीता कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

८. मोहोरबंद लिफाफ्यावर **'श्रमकल्याण युग गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार विशेषांक छपाई '** असे स्पष्ट नमूद करावे. सर्व दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

९. ठेकेदाराने विहित नमून्यातील दरपत्रकासोबत व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र / दुकाने व संस्था अधिनियमान्वये प्राप्त पंजिकृत प्रमाणपत्र, जीएसटी नंबर प्रमाणपत्र, पॅनकार्ड, अद्ययावात आयकर परतावा प्रमाणपत्र इ. सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत छायाप्रती तसेच मुळ हमीपत्र व यापुर्वी छपाई केलेले अंक व त्याबाबतची कागदपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदाराच्या देयकातून आयकर नियमानुसार टी.डी.एस. कपात केली जाईल.

११. प्रशासकीय / तांत्रिक कारणास्तव दरपत्रक तसेच कामाचा ठेका रद्द करण्याचा अधिकार मंडळास असेल. तसेच ठेकेदाराने काम समाधानकारकरित्या व विहित वेळेत पुर्ण न केल्यास ठेका रद्द करण्यात येईल व कोणतेही देयक अदा केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१२. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मंडळ प्रशासनास राहील.

१३. कार्यालयीन वेळेत दिनांक २२.०१.२०२१ दुपारी २.०० वाजेपर्यंत मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयात दरपत्रक सादर करावेत. त्याचठिकाणी सर्व प्राप्त दरपत्रके दि.२२.०१.२०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येतील.

कल्याण आयुक्त

# दरपत्रक नमुना

( सदर नमुना ठेकेदाराच्या लेटरहहेडवर सादर करावा )

प्रति,

मा.कल्याण आयुक्त

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ,

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,

सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ

मुंबई - ४०० ०१३

**विषय : श्रमकल्याण युग विशेषांक छपाईबाबत.**

महोदय,

मंडळाच्या श्रमकल्याण युग गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार विशेषांक २०१५ व २०१७ या अंकाचे खालीलप्रमाणे नमूद दरात काम करण्यास मी / आम्ही तयार आहे / आहोत.

| कामाचा तपशिल | विशेषांक संख्या | दर प्रती अंक | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| **श्रमकल्याण युग पुरस्कार विशेषांक छपाई**<br>अंकाची अक्षरजुळणी, मांडणी व सजावट, मुद्रितशोधन, स्केच, ग्राफिक्स, फोटो प्रोसेसिंग, स्कॅनिंग, मुखपृष्ठ व मलपृष्ठ डिझायनिंग इत्यादी अनुषंगिक कामे.<br>• अंकाचा आकार १९ से.मी. × २७ सें.मी असेल.<br>• मुखपृष्ठ व मलपृष्ठासह अंदाजित पृष्ठसंख्या - ७२.<br>• मुखपृष्ठ व मलपृष्ठ लॅमिनेशनसह – १७० जीएसएम ग्लास<br>• आर्ट पेपर - आतील पाने - १०० जीएसएम ग्लास आर्ट पेपर<br>• छपाई चार रंगात | २००० | | |
| अधिक जीएसटी | | | |
| एकूण रक्कम रु. | | | |

दिनांक :

शिक्का :

ठेकेदार/प्रतिनिधीची सही :

संस्थेचे नाव :

संपुर्ण पत्ता :

मोबाईल क्र.:

# हमीपत्र नमुना

(सदर नमुना ठेकेदाराच्या लेटरहहेडवर सादर करावा)

प्रति,

मा.कल्याण आयुक्त

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,

सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ

मुंबई - ४०० ०१३

विषय : श्रमकल्याण युग विशेषांक छपाई हमीपत्र

महोदय,

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वरील विषयांकीत दरपत्रकात नमूद सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून त्यासंबंधीची सर्व माहिती समजून घेतली आहे. दरपत्रकासंबंधी माझी/आमची कोणत्याही प्रकारची शंका राहिलेली नाही. हे दरपत्रक लक्षपुर्वक भरले आहे.

१. निविदेतील संपुर्ण काम मांडळाच्या अटी, शर्ती व सुचना नुसार विहीत मुदतीत पुर्ण करण्यास माझी / आमची तयारी आहे.

२. मंडळाच्या नमूद सर्व अटी, शर्ती व सुचना मला / आम्हाला मान्य असून त्या माझ्यावर / आमच्यावर बंधनकारक आहेत. संबंधीत सर्व अटी, शर्ती व सुचना वाचून समजुन घेतल्या आहेत.

३. दरपत्रक सुचनेतील नमूद काम सर्व अटी, शर्ती व सुचनानुसार न चूकता करण्याची मी / आम्ही हमी देत आहे. कामात काही अडचण / विलंबामुळे नुकसान झाल्यास जबाबदारी माझी / आमची राहील.

दिनांक :

शिक्का :

ठेकेदार/प्रतिनिधीची सही :

संस्थेचे नाव :

संपुर्ण पत्ता :

मोबाईल क्र.:

## श्रमकल्याण युग विशेषांक छपाई दरपत्रकासोबत जोडलेली कागदपत्र यादी

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वरील विषयांकीत दरपत्रकात नमूद सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून त्यासंबंधीची सर्व माहिती समजून घेतली आहे. दरपत्रकासंबंधी माझी/आमची कोणत्याही प्रकारची शंका राहिलेली नाही. हे दरपत्रक लक्षपुर्वक भरले आहे. दरपत्रकासोबत जोडलेली कागदपत्र यादी खालीलप्रमाणे आहे.

| अनु. | तपशील | जोडले आहे / नाही | शेरा |
|---|---|---|---|
| | | | |
| १. | विहित नमुन्यातील दरपत्रक | | |
| २. | विहित नमुन्यातील हमीपत्रक | | |
| ३. | व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ४. | दुकाने व संस्था नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ५. | जी.एस.टी. नंबर प्रमाणपत्र | | |
| ६. | पॅन कार्ड | | |
| ८. | मागील छापलेले अंक व कार्यादेश | | |

दिनांक :

शिक्का :

ठेकेदार/प्रतिनिधीची सही :

संस्थेचे नाव :

संपुर्ण पत्ता :

मोबाईल क्र.: